August 30, 2024

| | |
|---|---|
| The Manager | The Manager |
| BSE Limited | The National Stock Exchange of India Limited |
| Corporate Relationship Department | Exchange Plaza, |
| P. J. Towers, Dalal Street, | Bandra - Kurla Complex, Bandra (E), |
| Mumbai – 400 001. | Mumbai – 400 051. |
| | |
| BSE Scrip Code No. 524280 | NSE Symbol: KOPRAN |

Dear Sir/Madam,

**Sub: Newspaper advertisement - Notice of 65th Annual General Meeting to be held through VC/ OAVM, Book Closure and Final Dividend**

In compliance to Regulations 30 and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith copies of public notice on the subject matter, published by way of newspaper advertisement on Friday, August 30, 2024 in the following newspapers:

1. Business Standard (English newspaper)
2. Tarun Bharat (Marathi Newspaper)

The above information is also available on the website of the Company at www.kopran.com.

Please take the same on record.

Regards,
For Kopran Limited

Sunil Radheyshyam Sodhani

Digitally signed by Sunil Radheyshyam Sodhani
DN: c=IN, o=Personal, title=7249, pseudonym=E7BA0B166EFA7B7D81393E0488359925B0DF1CDF, 2.5.4.20=5cecec1af27b3e58afe7ae706769ddad31de89dbce635c287151d6270caabb60, postalCode=400069, st=Maharashtra, serialNumber=903718D01AA9D383C476B9CFF5D485FC7B7AA7E6A5D9DC32ACCECA32C46E9C75, cn=Sunil Radheyshyam Sodhani
Date: 2024.08.30 17:35:08 +05'30'

Sunil Sodhani
Company Secretary & Compliance Officer
Membership No. FCS 3897

# बुलेट ट्रेन प्रकल्पाचे एलिव्हेटेड काम सुरू

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉरच्या १३५ किमी लांबीच्या एलिव्हेटेड सेक्शनचे बांधकाम हे हायस्पीड रेल्वे प्रकल्पातील एक आव्हानात्मक विभाग आहे. गुजरात-महाराष्ट्र सीमेजवळील शिळफाटा ते झारोली गावादरम्यान असलेला हा मार्ग ठाणे आणि पालघर जिल्ह्यांचा समावेश असलेल्या मुंबई महानगर प्रदेशातील ९५ गावे-शहरांमधून जाणार आहे.

मुंबईपासून हा प्रकल्प जवळ असल्याने रेल्वेमार्ग, महामार्गासह अन्य पायाभूत सुविधाप्रकल्पही या भागात येत आहेत. बांधकाम प्रगतीमध्ये भू-तांत्रिक तपासणी जवळजवळ पूर्ण होणे, डोंगरी बोगद्यांचे काम सुरू करणे आणि घाटाच्या कामासाठी अंदाजे २६५ ओपन फाऊंडेशन (सुमारे ११ किमी) पूर्ण करणे हे समाविष्ट आहे. बोईसर आणि विरार स्थानकांवरही पायाभरणीचे काम सुरू झाले आहे. या महत्त्वाच्या भागाचे बांधकाम जसजसे पुढे जात आहे, तसतसे मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प या भागातील प्रवासात परिवर्तन करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे आला आहे. अभियांत्रिकी गुंतागुंतीच्या आव्हानांवर मात करून दाट लोकवस्ती आणि संरक्षित वन्यजीव अभयारण्यांमधून जाणारा हा विभाग पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा वेळ लक्षणीयरित्या कमी होईल. इतकेच नाही, तर प्रादेशिक कनेक्टिव्हिटीला चालना मिळणार आहे.



### आव्हानात्मक बांधकामाची मुख्य वैशिष्ट्ये

- **वायडक्ट आणि पूल :** १३५ किमीपैकी १२४ किमीमध्ये ११ स्टील पुलांसह वायडक्ट आणि पूल असतील.
- **डोंगर आणि बोगदे :** या विभागात सात डोंगरातील बोगदे असतील. एक समुद्राखालील बोगदा असणार आहे.
- **स्थानके आणि डेपो :** ठाणे, विरार आणि बोईसर या तीन स्थानकांसह ठाणे येथे रोलिंग स्टॉक डेपोचे नियोजन आहे.
- **क्रॉसिंग :** मध्य आणि पश्चिम रेल्वेमार्ग, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, मुंबई उपनगरीय मार्ग आणि एलिव्हेटेड मुंबई मेट्रो लाईन-५ यांसह अनेक महत्त्वाच्या पायाभूत सुविधांमधून हा मार्ग पार करेल. राष्ट्रीय महामार्ग-४८ आणि मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग-३ या प्रमुख महामार्गांवरही हा मार्ग जाणार आहे.
- **नदी पूल :** या विभागात चार प्रमुख नद्यांवर पूल असतील. सर्वात आव्हानात्मक उल्हास नदीवरील ४६० मीटर स्टील पूल आहे, जी प्रकल्पातील सर्वात वजनदार स्टील संरचना असेल (९ हजार, ६७२ मेट्रिक टन). वैतरणा नदीवरील सर्वात लांब पूल २.३२ किमी लांबीचा असणार आहे.
- **वन्यजीव अभयारण्य :** उत्तर-पश्चिम महाराष्ट्रातील वन्यजीवांसाठी काही पर्यावरणीय हॉटस्पॉट - संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (एसजीएनपी) आणि तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य (टीडब्ल्यूएस) या ठिकाणांच्या जवळून हे संरेखन असेल. या प्रकल्पामुळे परिसरातील पर्यावरणावर विपरित परिणाम होऊ नये, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत.

## पीओपीच्या मूर्त्यांवरील बंदीची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करणार

### पालिकेचे उच्च न्यायालयात स्पष्टीकरण

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

'केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळा'ने (सीपीसीबी) बंदी घातल्यानंतरही मुंबईत मोठ्या प्रमाणात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेशमूर्ती तयार केल्या जात असल्याचा आणि 'राज्य सरकार व राज्य प्रदूषण मंडळ'ही (एमपीसीबी) या मुद्द्याकडे दुर्लक्ष करत असल्याची जनहित याचिका उच्च न्यायालयात सादर करण्यात आली होती. त्यासंदर्भात पालिकेने उच्च न्यायालयाला स्पष्टीकरण दिले की, ''मुंबईत गणेशोत्सव साजरा करण्याचे व्यापक स्वरुप, मोठ्या गणेशमूर्ती आणि उत्सवावर अवलंबून असलेला अनेकांचा उदरनिर्वाह या सगळ्या गोष्टीचा विचार करून 'सीपीसीबी'ने नियमावलीची विशेषतः 'पीओपी' बंदीची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.''

''गणेशमूर्तीसाठी 'पीओपी'च्या वापरावर 'सीपीसीबी' सुधारित नियमावलीनुसार बंदी घातली आहे. तरीही मुंबईत 'पीओपी'चा वापर होत असल्याने 'सीपीसीबी'च्या मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी विशेषकरून 'पीओपी'च्या मूर्ती वापरावरील बंदीसाठी कोणत्या उपाययोजना केल्या?'' अशी विचारणा न्यायालयाने राज्य सरकार, पालिका आणि 'एमपीसीबी'ला केली होती. तसेच, त्याबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते.

पालिकेच्या परिमंडळ-२चे उपायुक्त प्रशांत सपकाळे यांनी हे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्या प्रतिज्ञापत्रकात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मूर्तिकार, गणेशोत्सव मंडळ आणि संबंधित यंत्रणांसह बैठक घेण्यात आल्याचे आणि मूर्तिकारांना शाडूची माती वापरण्याचे आवाहन करण्यात आल्याचे पालिकेने सांगितले. दरम्यान 'सीपीसीबी'च्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणाऱ्या कार्यशाळांवर २० हजार रुपये दंड आकारण्याचा दावाही पालिकेने केला आहे.

## चौपाट्यांवरील धूप रोखण्यासाठी 'जिओ ट्यूब'चा वापर

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

''मुंबईला लाभलेल्या विशाल अशा समुद्रकिनाऱ्यांची अनेक पर्यटकांना भूरळ पडते. मात्र दिवसेंदिवस होणाऱ्या पर्यावरणीय बदलांसह अनेक कारणामुळे दादर, माहिम येथील समुद्रकिनाऱ्याची धूप होत आहे. त्यामुळे या भागांतील चौपाट्या फक्त २० ते २५ फूट इतक्याच शिल्लक राहिलेल्या दिसतात. या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून 'जिओ ट्यूब' तंत्रज्ञानाचा वापर करून समुद्रकिनारे पूर्ववत करण्यात येणार आहेत,'' अशी माहिती मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

''मुंबईचे समुद्रकिनारे आकर्षक आहेत. मात्र दादर, माहिमसारख्या चौपाट्यांचा मागील काही वर्षांपासून ऱ्हास होत आहे. भरतीचे पाणी वाहून गेल्याने तसेच वातावरणीय बदलामुळे धूप झाल्याने खडकाळ भाग चौपाट्यांवर पाहायला मिळतो. त्यामुळे 'जिओ ट्यूब' तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे पर्यटनाला वाव मिळेल. तसेच यामुळे मुंबईकरांना समुद्रकिनाऱ्याचा आनंद लुटता येईल,'' असा विश्वास मंत्री केसरकर यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, ''याच धर्तीवर प्रभादेवी ते माहिम या किनाऱ्याचे संवर्धन करण्याचा आमचा विचार आहे,'' असेही केसरकरांनी सांगितले.

### काय आहे 'जिओ ट्यूब' तंत्रज्ञान?

'जिओ ट्यूब' तंत्रज्ञान हे पर्यावरणस्नेही असल्याने मुंबईकर किंवा जैवविविधतेवर त्यांचा कोणताही परिणाम होत नाही. यामध्ये नैसर्गिक 'पॉलिमर'पासून बनवलेल्या भू-नळ्या या गाळाने किंवा वाळूने भरून समुद्रकिनाऱ्याला समांतर ठेवल्या जातात. ज्यामुळे भरती-ओहोटीच्या वेळी लाटांचा प्रभाव कमी होऊन धूप कमी होण्यास मदत होते.

## भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित निबंध स्पर्धा

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

श्री भगवान महावीर यांच्या २ हजार, ५५०व्या निर्वाण वर्षानिमित्त मांगल्य उजावणी साजरी करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. सर्व शाळांमध्ये पाचवी ते दहावी या वर्गाकरिता दि. १५ सप्टेंबर ते दि. २० सप्टेंबर या कालावधीकरिता निबंध स्पर्धा घेतली जाणार असल्याची माहिती कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.



मंत्रालयात श्री भगवान महावीर यांच्या २ हजार, ५५०व्या निर्माण वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांसाठी मंत्री लोढा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी व्यवस्थापन समितीचे सदस्य ललीत गांधी, पवन संघवी, संदीप भंडारी, सांस्कृतिक संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, उपसंचालक शिक्षण कार्यालयाच्या शिक्षण निरीक्षक भक्ती गोरे यावेळी उपस्थित होत्या.

मंत्री लोढा म्हणाले की, ''श्री भगवान महावीर यांच्या २ हजार, ५५०व्या निर्वाण वर्षानिमित्त मांगल्य उजावणी साजरी करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच विविध प्रदर्शने, जिल्हास्तरावर व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रम, चित्ररथ, माहितीपटाचे आयोजन करावे, या कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी राज्यस्तरीय समितीचे गठन करण्यात आले असून जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली आहे.''

### कुठे होणार स्पर्धा?

''शालेय, तालुका व जिल्हास्तरावर ही स्पर्धा आयोजित करण्यात येईल. या स्पर्धेसाठीचे निकष व माहिती लवकरच घोषणा करण्यात येईल. जिल्ह्यातील प्रत्येक शाळेपर्यंत खासगी, सरकारी, अनुदानित व विनाअनुदानित अशा सर्व शाळांना या स्पर्धेबाबत माहिती होईल, यासाठी योग्य ती कार्यवाही करावी. विद्यार्थ्यांकडून प्रवेशिका मागविणे, स्पर्धांचे आयोजन करणे, जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीचे गठन करणे, स्पर्धेचा निकाल घोषित करणे, स्पर्धेच्या निकालाची माहिती शासनास सादर करणे, कार्यक्रमांबाबत विविध माहिती सादर करण्याची कार्यवाही काटेकोरपणे करावी,'' असे निर्देश मंत्री लोढा यांनी समितीला दिले.



**मुंबई :** 'मुलुंड सेवा संघा'चे अध्यक्ष तसेच भाजपचे माजी नगरसेवक प्रकाश गंगाधरे यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार, दि. २९ ऑगस्ट रोजी दै. 'मुंबई तरुण भारत'चे एक्झिक्युटिव्ह, स्पेस सेलिंग सेल्स प्रशांत शिवाजी कांबळे यांनी त्यांच्या मुलुंड येथील कार्यालयात भेट घेऊन गंगाधरे यांना शुभेच्छा दिल्या.

**कोपरण लिमिटेड**
सीआयएनः L24230MH1958PLC011078
**नोंद. कार्यालयः** पारिजात हाऊस, १०७६, डॉ. ई. मोजेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८
**वेबसाईटः** www.kopran.com, **ईमेल आयडीः** investors@kopran.com
**दूर. क्र.:** ०२२-४३६६११११; **फॅक्स क्र.:** ०२२-२४९५०३६३

**व्हिडियो कॉन्फरन्स (व्हीसी/इतर दृक श्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) घेण्यात येणाऱ्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, बुक क्लोजर तारखा.**

१. **कोपरण लिमिटेड** च्या सदस्यांची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') **बुधवार, ११ सप्टेंबर, २०२४ रोजी स. ११.३० (भाप्रवे) वा.** व्हिडियो कॉन्फरन्स (व्हीसी) द्वारे घेण्याचे ठरविण्यात आले आहे. सदस्य एजीएमला एनएसडीएल ई-मतदान प्रणालीद्वारे व्हीसी/ओएव्हीएमद्वारे उपस्थित राहू शकतात.

२. दूरस्थ ई-मतदान सुविधा खालील कालावधीदरम्यान उपलब्ध असेलः

| | |
|---|---|
| ई-मतदानाची सुरुवात | रविवार, ०८ सप्टेंबर, २०२४ रोजी स. ९.०० (भाप्रवे) पासून |
| ई-मतदानाची समाप्ती | मंगळवार, १० सप्टेंबर, २०२४ रोजी सायं. ५.०० (भाप्रवे) पर्यंत |

३. सदस्यांचे निबंधक आणि कंपनीचे भाग हस्तांतरण वही लाभांश प्रदान करण्याकरिता कंपनीच्या सदस्यांची नोंद घेण्यासाठी **मंगळवार, ०३ सप्टेंबर, २०२४ ते गुरुवार, ०५ सप्टेंबर, २०२४ (दोन्ही दिवस समाविष्ट)** पर्यंत बंद राहतील.

४. सदस्य वार्षिक अहवाल २०२३-२४ वरील त्यांचे प्रश्न सभेच्या वेळेपूर्वी ४८ तास आधी त्यांच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावरून त्यांचे नाव, डीपी आयडी आणि क्लायंट आयडी/फोलियो क्रमांक, पॅन, मोबाईल क्रमांक नमूद करून investors@kopran.com येथे मेल करू शकतात. त्यांची उत्तरे एजीएममध्ये देण्यात येतील.

**कोपरण लिमिटेड**
सही/-
**सुनिल सोधानी**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**दिनांकः** ३० ऑगस्ट, २०२४
**ठिकाणः** मुंबई

## नाट्य स्पर्धेच्या प्रवेशिकेसाठी मुदतवाढ

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या राज्य नाट्य प्रवेशिका सादर करण्यासाठी दि. ५ सप्टेंबर रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती 'सांस्कृतिक कार्य संचालनालया'चे संचालक बिभीषण नवरे यांनी दिली आहे. राज्य नाट्य स्पर्धेतील हौशी मराठी, हिंदी, संस्कृत, संगीत, बालनाट्य व दिव्यांग बालनाट्य या वर्गवारीसाठी प्रवेशिका सादर करण्याची अंतिम तारीख दि. २६ ऑगस्ट होती. मात्र, काही नाट्यसंस्था व संघटनांनी या प्रवेशिका सादर करण्यासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली होती. जास्तीतजास्त संघांना या स्पर्धेत भाग घेता यावा, यासाठी प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करून सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांची ही मागणी मान्य करून प्रवेशिका सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, अशी सूचना 'सांस्कृतिक कार्य संचालनालया'स केली.

## आचरेकरांचे स्मृतिशिल्प शिवाजी पार्कवर

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यासह अनेक दिग्गज क्रिकेटपटूंना घडवणारे द्रोणाचार्य दिवंगत रमाकांत आचरेकर यांचे स्मृतिशिल्प दादरच्या शिवाजी पार्कवर उभारण्यात येणार आहे. नगरविकास विभागाने यासंदर्भात बुधवार, दि. २८ ऑगस्ट रोजी निर्णय घेतला. शिवाजी पार्कच्या गेट क्र. ५ जवळ हे स्मृतिशिल्प पाहायला मिळणार आहे.

शिवाजी पार्कवरील मैदानात आचरेकर यांनी अनेकांना क्रिकेटचे प्रशिक्षण दिले होते. त्याच मैदानात आचरेकरांचे स्मृतिशिल्प उभारून एकप्रकारे त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. हे स्मृतिशिल्प महापालिका उभारणार असून त्यासाठी आवश्यक परवानग्या महापालिकेकडून मिळवण्याच्या प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे. या स्मृतिशिल्पाच्या उभारणीवेळी शिवाजी पार्कातील वृक्षतोड करावी लागणार नाही, याची दक्षता महापालिकेकडून घेतली जाणार आहे. तसेच काही अपरिहार्य परिस्थितीत वृक्ष तोडायचे असतील, तर संबंधित प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल. आचरेकरांच्या स्मृतिशिल्पाच्या देखभाल, दुरुस्तीची जबाबदारी व त्यासाठीच्या निधीची जबाबदारी 'बी. व्ही. कामथ मेमोरियल क्रिकेट क्लब' उचलणार आहे. सरकार त्यासाठी निधी देणार नाही. मात्र स्मृतिशिल्पाच्या उभारणीकामाचा आढावा मुंबई शहर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती वेळोवेळी घेईल, अशी माहिती पालिकेने दिली आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E- TENDER 1st CALL NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in/ for following works:

| Sr. No. | RFX No. | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000033006 | **SE/EHV/O&M/CIR/KLW/TECH/ Ten-35/24-25** E-Tender for Work of providing and fixing of the High Insulation Epoxy Coating (INSULECT SK- 03) to the 22/33 KV LV Cable Bus of all Transformers and at bus of cable/ conductors at various S/S under EHV O&M Division Boisar /Bhandup /Kalwa. | Tender Downloading Dates & time. Tender Sale period. From **Dt: 30.08.2024, 00:00 Hrs to Dt. 06.09.2024, 09:59 Hrs** **Technical Opening: - Dt. 06.09.2024 at 10: 00 Hrs** (Onwards if possible) **Commercial Opening: - Dt. 06.09.2024 at 15:00 Hrs.** (Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 500 + GST** |
| | | **Estimated Cost** | **Rs. 27,90,478/-** |

**Contact Person** Executive Engineer/ Dy. Exe. Engineer (O) Tel No. 9769006245 / 7506379055 **Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

## सुरमणी पंडित अनंत केमकर यांचे निधन

**मुंबई, दि. २९ :**
**विशेष प्रतिनिधी**

किराणा घराण्याचा संगीत वारसा जोपासणारे ज्येष्ठ संगीतकार आणि हार्मोनियमवादक अनंत केमकर यांचे रविवार, दि. २५ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. भारतीय शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, वाद्य यांची उत्तम जाण असणाऱ्या जुन्या पिढीपैकी ते एक कलाकार होते. भारतातील अग्रगण्य हार्मोनियमवादकही ते होते. अनेक नामवंत संगीत दिग्दर्शक, कलाकार यांच्यासोबत त्यांनी हार्मोनियमची साथ संगत केली. तसेच संगीत दिग्दर्शनही केले.



हिराबाई बडोदेकर, नारायण व्यास यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले आहे. पुढे जाऊन त्यांनी देशविदेशात भारतीय शास्त्रीय संगीत मैफिलींचे अनेक कार्यक्रम केले. त्यांचा जन्म पुण्यात झाला. पुढे संगीत क्षेत्रात काम करण्यासाठी ते मुंबईत आले. त्यांनी आपला कलेचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी अनेक उत्तम शिष्यवर्गही तयार केले. आकाशवाणी आणि दूरदर्शनवर त्यांचे नियमित कार्यक्रम होत असत. 'साद सुरांची साथ अनंता'ची हे त्यांचे आत्मचरित्रपर पुस्तकही प्रकाशित झाले आहे.

आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी संगीताचा वसा कायम ठेवला. विशेष म्हणजे त्यांच्यासाठी सेवेत असणाऱ्या रुग्णसेवकालाही महिन्याभरात उत्तम गाणी तसेच राष्ट्रीय गीत शिकवले. महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक मंत्रालयातर्फे नुकताच त्यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला होता. संगीत क्षेत्रातील अनेक नामवंत कलाकारांनी व रसिकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

## गणेशोत्सव महासंघाकडून धर्मादाय आयुक्तांकडे पत्राद्वारे विविध मागण्या

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

मुंबईत जवळपास दहा हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. उपनगरात दरवर्षी मंडळांची संख्या वाढतच असते. त्यामुळे 'अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघा'ने धर्मादाय आयुक्तांचे पत्राद्वारे मंडळांना येणाऱ्या अडचणी, समस्यांकडे लक्ष वेधले आहे.

महासंघाचे प्रमुख कार्यवाह सुरेश सरनोबत म्हणाले की, ''गणेशोत्सव मंडळे देणगी, वर्गणी जमा करून उत्सव साजरा करतात. परंतु, उत्सव मंडळे आणि मंदिरे यांना एकसारखेच नियम असतात. मुळात मंदिरांकडे मोठे 'बजेट' असते. मात्र, मंडळांकडे इतक्या मोठ्या प्रमाणात 'बजेट' नसते. अशावेळी सारखे नियम कसे लागू होऊ शकतील?'' असा प्रश्न सरनोबत यांनी उपस्थित केला आहे. तरी यामध्ये बदल करण्यासंदर्भात धर्मादाय आयुक्तांनी निर्णय घेण्याची विनंती करत विविध विषयासंदर्भातील मागणी पत्र दिले आहे.



दरम्यान, ''अखिल सार्वजिनक गणेशोत्सव महासंघा'ने नवीन गणेशोत्सव मंडळांना एक खिडकी योजनेद्वारे ऑनलाईन किंवा ऑफलाईन परवानगी द्यावी. उत्सवाच्या माध्यमातून फिजियोथेरपी सेंटर, व्यायामशाळा, रुग्णवाहिका, मेडिकल सेंटर असे अनेक उपक्रम राबवणाऱ्या मंडळांना विशेष सवलत मिळावी,'' अशी मागणी महासंघाने केली आहे.

**CAPACIT'E**
**कॅपेसिट इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड**
**नोंद. कार्यालयः** ६०५-६०७, श्रीकांत चेंबर्स, फेज-१, ६ वा मजला, आर. के. स्टुडियोच्या जवळ, सायन-तुर्भे रस्ता, मुंबई - ४०००७१. **CIN:** L45400MH2012PLC234318
**दूरध्वनीः** +९१ (२२) ७१७३ ३७१७; **फॅक्सः** +९१ ७१७३ ३७३३;
**ईमेलः** compliance@capacite.in; **वेबसाईटः** www.capacite.in

**व्हिडियो कॉन्फरन्स (व्हीसी)/इतर दृक श्राव्य माध्यमे (ओएव्हीएम) द्वारे घ्यावयाची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**

कॅपेसिट इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड ("कंपनी") च्या सदस्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचे कामकाजा करण्याकरिता गुरुवार, २६ सप्टेंबर, २०२४ रोजी स. ११.३० वा. घेण्यात येणार आहे. एजीएमची सूचना योग्यरित्या पाठविण्यात येईलः

**एजीएममध्ये सहभागी होण्याची पद्धत आणि सूचना**
सदस्य एजीएममध्ये फक्त व्हिडियो कॉन्फरन्स ("व्हीसी")/इतर दृक श्राव्य माध्यमे ("ओएव्हीएम") द्वारे सहभागी होऊ शकतात. सभेमध्ये सहभागी होण्याच्या सूचना एजीएम सूचनेमध्ये देण्यात येतील.

**मतदानाची पद्धत आणि सूचना**
सदस्य दूरस्थ ई-मतदान सुविधा किंवा एजीएमदरम्यान ई-मतदानाद्वारे मतदान करू शकतात. डीमटेरिअलाईज्ड स्वरुपात आणि प्रत्यक्ष स्वरुपात भागधारणा करणाऱ्या सदस्यांकरिता दूरस्थ ई-मतदान/ई-मतदानाची पद्धत एजीएम सूचनेमध्ये देण्यात आली आहे.

**एजीएम सूचना आणि वार्षिक अहवाल.**
सूचना आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता वार्षिक अहवाल योग्य कालावधीमध्ये, ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे/डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्स ('डीपीस') आणि निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट ("आरटीए") कडे नोंदणीकृत आहेत अशांना फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात येतील. सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट www.capacite.in, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाची वेबसाईट www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com आणि आरटीएची वेबसाईट https://evoting.kfintech.com/public/downloads.aspx वर देखील उपलब्ध आहे.

**ईमेल आयडी नोंदविण्याची पद्धत**
ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदविलेले नाहीत आणि परिणामी, सूचना आणि वार्षिक अहवाल प्राप्त झालेले नाहीत, त्यांना याद्वारे विनंती आहे की, त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते आणि मोबाईल क्रमांक खाली उल्लेखिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून आरटीएकडे नोंदवावेः
- प्रत्यक्ष स्वरुपात भागधारणा करणारे सदस्य त्यांचे ई-मेल पत्त्यासह संपर्क तपशील आवश्यक फॉर्म आयएसआर-१ व त्यासह सहाय्यक दस्तऐवज कंपनीचे आरटीए यांच्याकडे त्यांच्या केफिन टेक्नोलॉजीस लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गाचीबौली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद - ५०००३२ येथील कार्यालयात किंवा einward.ris@kfintech.com येथे ईमेलद्वारे सादर करून अद्ययावत/नोंदणी करू शकतात. फॉर्म आयएसआर-१ https://karisma.kfintech.com/downloads/2Form_ISR-1.pdf येथून डाऊनलोड करता येईल आणि या संदर्भातील तपशीलवार एफएक्यू https://ris.kfintech.com/faq.html येथे उपलब्ध होतील.
- डीमटेरिअलाईज्ड स्वरुपात भागधारणा करणाऱ्या सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते त्यांच्या संबंधित डीपीसकडे नोंदणी/अद्ययावत करावे.
- सेबीने त्यांच्या दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार प्रत्यक्ष स्वरुपात भाग धारणा करणाऱ्या सदस्यांना इतर बाबींसोबतच, पॅन, केवायसी (संपर्क तपशील, बँक तपशील आणि नमुना स्वाक्षरी), आणि नामनिर्देशन तपशील नोंदविणे अनिवार्य केले आहे.

**प्रश्न**
ईमेल आयडी नोंदणीकरण किंवा दूरस्थ ई-मतदान किंवा एजीएमदरम्यान ई-मतदानामध्ये सहभागी होण्याच्या संदर्भात कोणतेही प्रश्न असल्यास, सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी einward.ris@kfintech.com येथे लिहून पाठवावे किंवा १८०० ३०९ ४००१ (टोल फ्री) येथे संपर्क साधावा.

**उद्घोषणा**
कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे पारित दिनांक ५ मे, २०२० रोजीचे परिपत्र आणि त्यानंतर या संदर्भात पारित, सर्वात अलिकडचे दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजीचे परिपत्रक ('एमसीए परिपत्रके') आणि भारतीय प्रतिभूती आणि विनियमन मंडळाद्वारे पारित दिनांक १२ मे, २०२० रोजीचे परिपत्र आणि त्यानंतर या संदर्भात पारित, सर्वात अलिकडचे दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे परिपत्रक ('सेबी परिपत्रके') च्या अनुपालनामध्ये एजीएम आयोजित करण्यात येईल.
सदर जाहीर सूचना कंपनीच्या सदस्यांच्या माहिती आणि फायद्याकरिता आणि एमसीए व सेबी परिपत्रकांच्या अनुपालनामध्ये पारित करण्यात येत आहे.

**कॅपेसिट इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड करिता**
**सही/-**
**राहुल कपूर**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**ठिकाणः मुंबई**
**दिनांकः २९ ऑगस्ट, २०२४**

रजि.नं.एमएससीएस/सिआर/ ४३३/२०११
**निशांत मल्टी-स्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि. अकोला**
मुख्य कार्यालय : ३ रा माळा, निशांत टॉवर, गांधी रोड, अकोला. फोन ०७२४-२४४०१०८, २४४३१३६, टोल फ्री क्र.१८००२१२२७२२

**वार्षीक सर्वसाधारण सभेची सूचना (फक्त सभासदांसाठी)**
**(कार्यक्षेत्र – महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्य)**

**जा.क्र.५८४५ /२०२४** **दि.३० ऑगस्ट २०२४**

**संस्थेच्या सर्व भागधारकांना कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२३-२४ या सहकारी वर्षाची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि.१४ सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार मा.श्री.रणधीर सावरकर यांचे अध्यक्षते खाली दुपारी ठिक ३.०० वाजता, सभागृह, निशांत टॉवर, गांधी रोड, अकोला येथे खालील विषयांवर चर्चा करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. या सभेस आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.**
**मा.संचालक मंडळाचे आदेशानुसार...**

**सभेपुढील विषय**

**१. दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. २. संस्थेच्या ३१.०३.२०२४ रोजी संपणाऱ्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा – तोटा पत्रक मंजुर करणे. ३. संस्थेच्या ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षातील निव्वळ नफ्याच्या विनियोजनास मान्यता देणे. ४. सन २०२४-२५ सालासाठी ठरविलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व २०२३-२०२४ मध्ये अंदाजपत्रका पेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे. ५. सन २०२४ – २०२५ सालाकरीता बाहेरील कर्ज काढण्याची मर्यादा ठरविणे. ६. सन २०२२ – २०२३ च्या अंकेक्षण दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे व सन २०२३-२०२४ च्या अंकेक्षण अहवालाची नोंद घेणे. ७. मल्टीस्टेट को-ऑप सोसायटी ॲक्ट २००२ अन्वये सन २०२४-२५ या वर्षाकरीता वैधानिक लेखा परिक्षकाची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे. ८. संस्थेचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक कर्मचाऱ्यांची यादी प्रसिद्ध करणे. ९. संस्थेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जाची माहिती देणे. १०. डेडस्टॉक व इतर रक्कमा हिशोबातून काढून टाकणे. ११. उपविधी दुरुस्तीस मान्यता देणे. १२. सन २०२३-२०२४ या आर्थीक वर्षात सभासदत्व रद्द झालेल्या सभासदांची यादी सादर करणे व त्यास मान्यता देणे. १३. संस्थेच्या सामोपचार 'एकरक्कमी परतफेड योजने अंतर्गत सवलत दिलेल्या थकीत कर्ज खात्याची माहिती घेऊन मान्यता देणे. १४. संस्थेच्या प्रस्तावित नविन शाखा उघडणेबाबत चर्चा करणे. १५. अध्यक्षीय परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.**

**दि.३० ऑगस्ट २०२४**
**अकोला.**

**राजेश बाभुळकर**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सभासदांना सुचना**

१. गणपुर्तीअभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व विषय सुचिमध्ये नमुद केल्याप्रमाणे सभेचे कामकाज होईल. त्या सभेला गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही. २. सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये काही प्रश्न, सुचना करावयाच्या असल्यास त्या सभेच्या सात दिवसापुर्वी मुख्य कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या व वेळेवर आलेल्या सूचनांचा विचार करणे बंधनकारक राहणार नाही. ३. सभासदांनी आपले निवासी पत्ते बदलले असल्यास त्वरित कळवावेत. सभासदांसाठी वार्षिक अहवाल सर्व शाखांमध्ये उपलब्ध असुन कृपया जवळच्या शाखेतुन प्राप्त करावा हि विनंती. ४. सतत पाच वार्षीक सर्वसाधारण सभेला अनुपस्थीत असलेल्या भागधारकाचे सभासदत्व रद्द होऊ शकते.

# Defence stocks take fire: Rally or retreat?

## Period of correction follows a prolonged bull run

SIRALI GUPTA
New Delhi, 29 August

Defence stocks have been on a slippery slope since the presentation of the Union Budget for 2024-25 (FY25) on July 23. Shares of Garden Reach Shipbuilders & Engineers, for instance, have lost 28.2 per cent, while Cochin Shipyard is down 24.7 per cent since then. BEML has dropped 17.2 per cent, Mishra Dhatu Nigam 18 per cent, and DCX Systems 11.4 per cent, according to ACE Equity data.

Shares of Bharat Dynamics, ideaForge Technology, Data Patterns (India), Apollo Micro Systems, Paras Defence & Space Technologies, MTAR Technologies, Astra Microwave Products, Solar Industries India, and Hindustan Aeronautics (HAL), on the other hand, have declined between 1.2 per cent and 10.6 per cent during the same period.

By comparison, the benchmark National Stock Exchange Nifty 50 has gained 2.7 per cent.

The fall was likely due to profit-booking after Finance Minister Nirmala Sitharaman fell short of increasing defence allocations in the Budget, but this could be seen as an opportunity to buy defence stocks for the long term.

"A correction was needed in defence stocks as they were overvalued after the Interim Budget amid high expectations from the Budget," said Palka Arora Chopra, director of Master Capital Services. The stocks, she added, are expected to remain subdued in the near term due to rich valuations. "For the long term, however, investors may buy the dips," she said.

### INTO A TAILSPIN

| Share price (in ₹) | 23/7/2024 | 29/8/2024 | % change |
|---|---|---|---|
| Garden Reach Shipbuilders | 2,445.20 | 1,754.90 | -28.2 |
| Cochin Shipyard | 2,596.20 | 1,954.40 | -24.7 |
| Mishra Dhatu Nigam | 483.3 | 396.4 | -18 |
| BEML | 4,618.90 | 3,824.80 | -17.2 |
| Bharat Dynamics | 1,467.50 | 1,296.90 | -11.6 |
| DCX Systems | 382.9 | 339.3 | -11.4 |
| CFF Fluid Control | 778.4 | 691.1 | -11.2 |
| ideaForge Technology | 788.1 | 705.4 | -10.5 |
| Data Patterns India | 3,091.70 | 2,778.70 | -10.1 |
| Paras Defence & Space Technologies | 1,342.50 | 1,216.30 | -9.4 |
| **NSE Nifty 50** | 24,479.10 | 25,152.00 | 2.7 |
| **Nifty Midcap 100** | 56,285.30 | 58,884.00 | 4.6 |
| **Nifty Smallcap 100** | 18,400.50 | 19,214.60 | 4.4 |

Compiled by BS Research Bureau
Sources: Bloomberg, NSE

### Budget woes

The defence budget for the current financial year (FY25) has been pegged at ₹6.21 trillion, the same as the Interim Budget unveiled in February. This is 0.3 per cent lower than 2022-23's Revised Estimate.

Of the ₹6.21 trillion, roughly ₹1.7 trillion was set aside for capital expenditure. Thus, the amount allocated to the defence sector, effectively, was ₹4.49 trillion, analysts said. The Budget disappointment, analysts added, triggered the long-due correction in the space, which saw a surge of up to 142 per cent in calendar year 2023.

Data shows Astra Microwave, Bharat Dynamics, Data Patterns, HAL, Krishna Defence & Allied Industries, Paras Defence, and Rossell India rallied between 19.4 per cent and 142 per cent last year compared to Nifty 50's rise of 20 per cent. They have gained between 15 per cent and over 105 per cent so far this year against Nifty 50's rise of 15.2 per cent. "Defence stocks have been in a strong bull run over the past one to two years. There should be no complaints about the short-term correction and profit-booking," said Gaurang Shah, head investment strategist at Geojit Financial Services.

### Buy for long term

Analysts believe defence stocks are still overpriced, with their price-to-earnings ratios not fully justified. Thus, they suggest not buying right now, as prices are expected to continue to drop. Interested investors, they added, should wait for further dips before entering these counters.

Shah, for instance, said the long-term growth story of the sector remains intact, backed by solid order intake and execution, which will eventually translate into earnings visibility.

"In the next three to five years, the management growth guidance, defence companies' active participation in the Make In India initiative, and vast export opportunities will boost the sector," said Chopra.

As of March 2024, HAL's order book stood at ₹94,129 crore. Bharat Heavy Electricals had a total outstanding order book of ₹1.31 trillion.

Bharat Dynamics' order book was valued at ₹19,434 crore, and Garden Reach Shipbuilders' order book stood at ₹22,652 crore.

As of June 30, 2024, Mazagon Dock Shipbuilders' order book was valued at ₹36,839 crore. Meanwhile, as of April 1, 2024, Bharat Electronics' order book stood at ₹75,934 crore.

YOUR MONEY

# Portfolio heavy on growth strategy? Add dividend yield fund

SARBAJEET K SEN

Among thematic funds, dividend yield schemes have rewarded investors with 24.26 per cent returns over the three years ended August 27, 2024, according to Value Research. Even as markets continue to rise, BoB BNP Paribas Dividend Yield Fund new fund offer (NFO) opened for subscription on August 22.

"Globally, we are at a point of transition from higher to lower interest rates. This is likely to lead to a shift across asset classes and geographies, leading to volatility. This could be the right time to consider dividend yield funds which invest in relatively stable companies and are likely to have lower volatility compared to the broader market," says Shiv Chanani, senior fund manager – equity, Baroda BNP Paribas Mutual Fund.

As of July 31, 2024, mutual funds managed AUM of ₹30,638 crore through nine dividend yield schemes, according to data from the Association of Mutual Funds in India (Amfi).

### What these funds do?

Dividend yield schemes invest in stocks that offer attractive dividend yield. The dividend yield of a stock is computed by dividing the dividend per share by the price of the stock. For example, if a stock quoting at ₹1,000 pays out a dividend of ₹30, then the dividend yield works out to be 3 per cent. The higher the dividend yield, the better it is, as it tends to contain downside.

"Companies that pay high dividends are often well-established and financially stable, which can make these funds less volatile compared to high growth-oriented funds. For those seeking regular income, these funds provide a steady stream of income through dividends," says Sailesh Jain, fund manager, Tata Mutual Fund.

### Is it a sound yardstick?

Companies with high dividend yields generally have strong balance sheets. "Companies that pay high dividends typically have strong cash flows and tend to be more stable," says Atul Shinghal, founder and chief executive officer (CEO) of Scripbox.

